# पुष्परचनेचे प्रकार

# परंपरागत पुष्परचना

परंपरागत पुंष्परचनेत जुन्या काळापासून चालत आलेल्या पुष्परचनांचा समावेश होतो. या रचनांमध्ये फुले-पाने नियमानुसार रचले जातात. पुष्परचना करणाऱ्या व्यक्तीच्या कल्पनाशक्तीला विशेष वाव दिल्या जात नाही.

धातूचे नक्षीकाम केलेल्या सुरईच्या किंवा गोल आकाराचे पुष्पपात्र मोठया प्रमाणात उपयोगात आणले जातात. इतर कुठल्याही पात्राचा रचनेकरीता उपयोग केल्या जात नाही. या पुष्परचनेत अनेक फुले उपयोगात आणली जातात. पानांचे प्रमाण रचनेत कमी असते. पुष्परचनेत पूर्ण उमललेल्या फुलांचा उपयोग केला जातो.

या रचनेत समान संतुलन साधल्या जाते. फुले गोल आकारात दाटीवाटीने लावण्यात येतात. पुष्परचना आकर्षक होण्यासाठी उपसाधनांचा वापर करण्यात येतो.

# जपानी पुष्परचना



या रचनेत पौर्वात्य पुष्परचना असेही म्हणतात. जपानमध्ये कलेचा विकास मोठया प्रमाणात झालेला आढळतो. नियमबध्य
पुष्परचना हे जपानी पुष्परचनेचे वैशिष्टय आढळते. जपानी पुष्परचना १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत पूर्णपणे विकसित झालेली होती.

जपानी  पुष्परचनेत तीन मुख्य फांद्याचा उपयोग केला जातो. सर्वात उंच फांदीला स्वर्ग, मध्यम फांदीला मनुष्य आणि लहान फांदीला पृथ्वी असे संबोधले जाते. या तीन फांद्याव्यतिरीक्त कुरण व पर्वत फांदीचा वापर करून पुष्परचनेला रूंदी प्रदान केल्या जाते. जपानी पुष्परचनेचे प्रकार खालीलप्रमाणेः–

अ) रिक्का

ब) मॉरीबाना

क) नागिरे

ड) झिनीबाना

इ) जियुबाना

फ) शोका

# अल्पाकृती पुष्परचना

ही रचना आकाराने अतिशय लहान असते. साधारणतः ५ इंच उंचीची ही पुष्परचना असते. बैठक खोलीत, साईड टेबलवर, लहान मुलांच्या, जेवणाच्या टेबलवर, अभ्यासाच्या टेबलवर ही रचना केली जाते. ह्याकरीता पुष्पपात्र देखील लहान आकाराचे वापरतात. लहान काचेच्या बाटल्या, सुंदर आकाराचे कप यांचा उपयोग पुष्पपात्र म्हणून केला जातो. या पुष्परचनेकरीता लहान आकाराच्या फुलांचा वापर करण्यात येतो. तसेच फुलांची संख्याही कमी असते. नाजूक फुले व त्याला शोभतील अशी पाने किंवा तुरे वापरून ही रचना करतात. विविध आकारांमध्ये ही रचना करता येते.

# शुष्क पुष्परचना



ज्या वेळेस ताजी फुले व पाने उपलब्ध होत नाहीत, त्या वेळेस वाळलेली पाने व फुलांचा वापर करून शुष्क पुष्परचना केली जाते.

शुष्क पुष्परचना करतांना निसर्गातील वाळलेल्या फांद्या, फुले, पाने, फळे यांचा कल्पकतेने उपयोग करण्यात येतो. हे साहित्य आहे त्याच रूपाने उपयोगात आणण्यात येते किंवा त्यांना रंग लावण्यात येतो किंवा पॉलिश करण्यात येते. वाळलेल्या लाकडी, खोडाला पार्श्वभाग मानून त्यावर वाळलेली फुले किंवा तुऱ्यांचा उपयोग करतात. नैसर्गिक आकारातील वाळलेल्या फांद्या, तुरे, गवत, गव्हाच्या ओंब्या, कापसाचे बोंड, बाजरीचे किंवा ज्वारीचे कणीस यांचा उपयोग करतात. या पुष्परचनेत रेषा व आकाराला प्राधान्य दिलेले आढळते.

शुष्क पुष्परचना या बराच काळ टिकणाऱ्या असतात. परंतु साहित्यांची स्वच्छता करणे आवश्यक असते. म्हणजे पुष्परचनेचे सौंदर्य कायम टिकून राहते.

# तरंगती पुष्परचना

उथळ पुष्पपात्रात अशा प्रकारची रचना करतात. यामध्ये पाणी घेऊन त्यामध्ये अशारितीने फुलांची रचना करतात की ती फुले तरंगताना दिसतात. मध्यभागी एक आकर्षक फूल लावून त्याभोवती फुले-पाने लावतात.